अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहामध्ये सादर करीत आहे.

१. सन २०१६-१७ साठी कर संकलनाचा सुधारित अंदाज रुपये एक लक्ष सदतीस हजार दोनशे तीस कोटी आहे. मला विश्वास आहे की, कर संकलनाची उद्दिष्टपूर्ती करण्यात आम्ही यशस्वी होणार. या अर्थसंकल्पामध्ये देशी व विदेशी मद्यावरील मूल्यवर्धित कर व साप्ताहिक लॉटरीवरील करवाढ वगळता इतर कोणत्याही बाबींवर करवाढ प्रस्तावित नाही.

**वस्तू व सेवा कर**

२. अप्रत्यक्ष करप्रणालीत सर्वात महत्त्वपूर्ण व दूरगामी परिणाम करणाऱ्या वस्तू व सेवा करप्रणालीचा अवलंब दिनांक १ जुलै २०१७ पासून अपेक्षित आहे. जीएसटी पद्धतीमुळे देशात एकसंघ बाजारपेठेची निर्मिती होईल. देशातील उत्पादने आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक होतील व देशाच्या आर्थिक प्रगतीस प्रोत्साहन मिळेल. जीएसटी अंतर्गत व्यापारातील वाढ, व्यापक कराचा पाया तसेच यथोचित कर अनुपालन यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या महसुलात वाढ होईल याबद्दल मला खात्री आहे.

**वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी**

३. संविधान एकशे बाविसावी सुधारणा विधेयकाचे अनुसमर्थन करताना, महाराष्ट्र विधानमंडळाच्या विशेष सत्रामध्ये जीएसटी करप्रणालीची तपशीलवार चर्चा करण्यात आली. सर्व सन्माननीय सभासदांनी जीएसटी करप्रणालीच्या आवश्यकतेबाबत मत प्रदर्शित केले व संविधानातील सुधारणा विधेयकाच्या अनुसमर्थनास एकमताने संमती दिली. त्या अनुषंगाने, जीएसटी कार्यप्रणालीच्या अवलंबनाकरिता आवश्यक असलेला संविधान एकशे एक संशोधन कायदा दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ पासून अंमलात आला आहे.

**वस्तू व सेवा कर परिषदेची निर्मिती व निर्णय**

४. जीएसटी करप्रणालीच्या अंमलबजावणीस आवश्यक असलेल्या बाबीवर केंद्रास व राज्यास शिफारशी करण्याकरिता जीएसटी परिषदेची निर्मिती करण्यात आली आहे. माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील या परिषदेच्या बारा बैठका झाल्या असून, त्यामध्ये सहमतीने कायद्याविषयक तसेच प्रशासकीय बाबीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, जीएसटी परिषदेने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती मी सभागृहास देत आहे :-

Åदिनांक १ जुलै २०१७ पासून जीएसटीची अंमलबजावणी करण्यात येईल.

Åप्रत्येक व्यापाऱ्याचा केंद्र किंवा राज्य अशा फक्त एकाच कर प्रशासनाशी संबंध येणार.

Åरु. १.५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या ९० टक्के व्यापाऱ्यांवर संबंधित राज्य शासनाचे तर उर्वरित १० टक्के व्यापाऱ्यांवर केंद्र शासनाचे प्रशासन असेल.

Åरु. १.५० कोटीपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांची, प्रशासनाकरिता केंद्र व राज्यामध्ये समप्रमाणात विभागणी होईल.

Åजीएसटी अवलंबनानंतर केंद्राने राज्य शासनास द्यावयाच्या नुकसानभरपाई कायद्याच्या प्रारुपास मान्यता देण्यात आली आहे.

Åनुकसानभरपाईच्या गणनेकरिता सन २०१५-१६ वर्षातील कर महसुलावर चौदा टक्के वार्षिक वाढ गृहित धरण्यात आली आहे.

Åनुकसानभरपाईच्या रकमेमध्ये, मुंबईतील जकात तसेच स्थानिक संस्था कराचाही समावेश असेल.

Åसर्वसाधारणपणे जीएसटीचा भार अस्तित्वातील कराच्या भाराइतकाच असेल.

Åजीएसटी कराचे दर शून्य, पाच, बारा, अठरा व अठ्ठावीस टक्के असतील.

Åसमुद्रकिनाऱ्यापासून बारा सागरी मैलांपर्यंत होणारे व्यवहार राज्यातील व्यवहार मानण्यात येतील.

**महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण अतिरिक्त खंडपीठाची निर्मिती**

५. जीएसटी कर प्रणालीचा अवलंब दिनांक १ जुलै २०१७ पासून अपेक्षित आहे. नविन करप्रणालीच्या पार्श्वभूमीवर मूल्यवर्धित कर कायद्याअंतर्गत प्रलंबित अपिलाचा निपटारा होऊन शासनाचा महसूल लवकर उपलब्ध होणे आवश्यक आहे. न्यायाधिकरणाकडे असलेल्या प्रलंबित अपिलांचा विचार करता खंडपीठांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाच्या तीन नवीन खंडपीठांची निर्मिती करण्याचे मी प्रस्तावित करतो.

**अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करणे**

६. राज्याचा शाश्वत व समतोल विकास साध्य करण्यासाठी अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करणे अनिवार्य असून जीएसटी कायद्याची अंमलबजावणी करताना करेतर महसुलामध्ये वाढ करणे अगत्याचे आहे. विविध कायद्यांतर्गत सेवाबाबत निर्धारित केलेले शुल्क, कोर्ट फीची रक्कम तसेच कसुराबाबत दंडाची रक्कम बऱ्याच कालावधीपूर्वी निर्धारित केली असून, ती रक्कम वर्तमानास धरून असावी याकरिता त्याचे पुनर्निरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामधून शासनास अतिरिक्त करेतर महसुलाची निर्मिती होईल याची मला खात्री आहे. महसूल निर्मितीच्या उपायांबरोबरच वित्तीय शिस्त पाळण्याचादेखील कसोशीने प्रयत्न केला जात आहे.

**कर अधिनियमातील सुधारणा**

७. अध्यक्ष महोदय, कर कायद्यातील प्रावधान अनुपालनास सोपे असावेत तसेच कर प्रशासनास करवसुलीकरिता सुलभ असावेत ही उद्दिष्टे लक्षात ठेवून कर अधिनियमात काही बदल मी प्रस्तावित करीत आहे.

➢ **<u>मूल्यवर्धित कर अधिनियम</u> :-**

Åमूल्यवर्धित कर अधिनियमाअंतर्गत व्यापाऱ्यातर्फे करण्यात आलेल्या अपिलांची संख्या लक्षणीय आहे. अपिलातील प्रकरणांचा निपटारा होण्याकरिता तसेच शासनाला देय महसूल जलद गतीने प्राप्त होण्याकरिता,—

(अ) अपील अधिकाऱ्यास, एकतर्फी निर्धारणा आदेशाविरुद्ध दाखल करण्यात आलेले अपील, निर्धारणा अधिकाऱ्याकडे परत पाठविण्याचा अधिकार देणेबाबत सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे निर्धारणा अधिकाऱ्यास एकतर्फी आदेश रद्द करण्याचे अधिकार निरसित करण्याचे प्रस्तावित आहे.

(ब) घोषणापत्राव्यतिरिक्त इतर अपिलातील देय वसुलीच्या स्थगितीकरिता व्यापाऱ्यास अंशत: रकमेचा (part payment) भरणा आवश्यक असतो. प्रत्येक प्रकरणात अंशत: रकमेची निश्चिती करण्यात अपील अधिकाऱ्याचा कालापव्यय होतो व वसुलीसही विलंब होतो. त्यामुळे प्रस्तावित जीएसटी कायद्याच्या धर्तीवर अपील दाखल करण्याकरिता व वसुलीस स्थगिती मिळण्याकरिता प्रत्येक अपिलामध्ये रुपये १५ कोटीच्या अधिकतम मर्यादेमध्ये विवादित कराच्या १० टक्के अंशत: रकमेचा भरणा अनिवार्य करण्याचे व त्या रकमेचे समायोजन देय कराच्या रकमेशी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच याबाबत आनुषंगिक व तांत्रिक बदल प्रस्तावित आहेत.

Åमूल्यवर्धित कर अधिनियमांतर्गत न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल करण्याकरिता एकशे वीस दिवसांचा कालावधी आहे. विक्रीकर विभागास तसेच व्यापाऱ्यास निर्णयातील कायदेशीर बाबी तपासणीकरिता पुरेसा कालावधी मिळावा याकरिता सदर कालावधी एकशे ऐंशी दिवस करण्याचे प्रस्तावित आहे.

Åआदेशान्वये देय असलेली वसुली करणे हे कर प्रशासनाचे महत्त्वाचे कार्य आहे. देय कराची वसुली टाळण्याकरिता व्यापाऱ्यांमार्फत अवलंबिल्या जाणाऱ्या मार्गांवर प्रभावी उपाययोजना करण्याकरिता काही प्रावधान करण्याचे प्रस्तावित आहे.

(अ) मूल्यवर्धित कर अधिनियमाअंतर्गत देय कराच्या वसुलीबाबत, केंद्रीय प्रावधानाच्या अधीन राहून, व्यापाऱ्याच्या मालमत्तेवर विक्रीकर वसुलीचा प्रथम अधिकार असल्याचे प्रावधान आहे. मात्र तो अधिकार कोणत्या क्षणी निर्माण होतो याबाबत संदिग्धता आहे. व्यापाऱ्यास देय रकमेबाबत नोटीसमध्ये उल्लेखलेल्या दिनांकास त्याच्या मालमत्तेवर विक्रीकर वसुलीच्या अधिभाराची निर्मिती होईल असे प्रावधान प्रस्तावित आहे.

(ब) मूल्यवर्धित कर अधिनियमाअंतर्गत कंपनीने देय कराचा विहित मुदतीत भरणा केला नाही तर कंपनीच्या मालमत्तेचा लिलाव करून कराची वसुली करण्याचे प्रावधान आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये असे लक्षात येते की, कंपनीकडे वसुलीकरिता मालमत्ता उपलब्ध नसते. कंपनीच्या कारभारास जबाबदार असलेल्या कंपनीचे संचालक यांच्या मालमत्तेतून कराची वसुली करता येत नाही. खाजगी कंपनीच्या करवसुलीकरिता कंपनी व संचालक एकत्रित व संयुक्तपणे जबाबदार ठरविणारे प्रावधान करण्याचे प्रस्तावित आहे.

Åमूल्यवर्धित कर अधिनियमाअंतर्गत व्यापाऱ्यास आदेशानंतर नव्वद दिवसांमध्ये परतावा न दिल्यास व्याज द्यावे लागते. व्यापाऱ्यांना लवकर परतावा मिळावा याकरिता ही मर्यादा “ईज ऑफ डुईंग बिझनेस” च्या उद्देशाने साठ दिवस करण्याचे प्रस्तावित आहे.

Åकर अधिनियमाअंतर्गत विहित मुदतीत कराचा भरणा न झाल्यास व्यापाऱ्यास विलंबाने भरलेल्या करावर व्याजाची आकारणी होते. व्यापाऱ्यास कराचा भरणा ई-पद्धतीने करणे अनिवार्य आहे. मात्र, काही प्रसंगी विक्रीकर विभागाच्या संगणकीय प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे व्यापाऱ्यास कराचा भरणा मुदतीत करता येत नाही. अशा प्रसंगी राज्य शासनास व्याजाची माफी देण्याचे अधिकार प्रदान करण्याचे प्रस्तावित आहेत.

Åजीएसटीच्या पार्श्वभूमीवर प्रचलित कायद्यातील प्रलंबित कार्यवाही शीघ्रगतीने पूर्ण करणे आवश्यक आहे, ज्यायोगे नवीन करप्रणालीच्या अंमलबजावणीकरिता करप्रशासन सुसज्ज असेल. त्याअनुषंगाने, प्रलंबित प्रकरणांचा निकषावर आधारित निपटारा करण्याबाबत राज्य शासनास अधिकार देणारे प्रावधान प्रस्तावित आहे.

त्याचबरोबर मूल्यवर्धित कर अधिनियमांतर्गत अनोंदित व्यापाऱ्यांना नोंदणी घेण्याकरीता प्रोत्साहन मिळावे ज्यायोगे ते जीएसटी अंतर्गत नोंदणीसाठी पात्र ठरावे याकरिता, अशा व्यापाऱ्यांना अनोंदित कालावधीतील देय कराचा भरणा केल्यानंतर काही प्रमाणात व्याजाची तसेच शास्तीची माफी देणारे प्रावधान करण्यात येईल.

➢ **<u>व्यवसाय कर अधिनियम</u>** :-

Åव्यवसाय कराअंतर्गत विलंबाने नोंदणी किंवा नावनोंदणी घेतलेल्या नियोक्त्यास वा व्यावसायिकास त्याने नोंदणी किंवा नावनोंदणी प्राप्त केल्याच्या मागील आठ वर्षे दायित्वाची परिगणना होऊ शकते. आठ वर्षांच्या करदायित्वामुळे नोंदणी न घेण्याचे प्रमाण अधिक आहे. व्यवसाय कराअंतर्गत नोंदणी किंवा नावनोंदणी घेण्यास प्रोत्साहन मिळण्याकरिता सदरचा कालावधी चार वर्षे करण्याचे प्रस्तावित आहे.

Åव्यवसाय कराअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या कराची कपात करून भरणा करण्याची जबाबदारी त्याच्या नियोक्त्यावर वा संस्थावर असते. विविध संस्थांमार्फत एजंटची नेमणूक केली जाते. मात्र एजंटने भरावयाच्या कराची जबाबदारी संस्थावर नसल्याने कराचे अनुपालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे एजंटच्या कराची जबाबदारी त्यांची नेमणूक करणाऱ्या संस्थेवर देण्याचे प्रस्तावित आहे.

Åव्यवसाय कराचा भरणा मुदतीत न केल्यास त्यावर मासिक सव्वा टक्के दराने व्याजाची आकारणी होते. कराचा भरणा वेळेवर व्हावा याकरिता मुदतीत न भरलेल्या करावर मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या धर्तीवर व्याजाची आकारणी प्रस्तावित आहे.

Åमूल्यवर्धित कराअंतर्गत नोंदणी घेतलेले व्यापारी व्यवसाय कराअंतर्गत नोंदणीस पात्र ठरतात. व्यवसाय कराची व्याप्ती वाढविण्याकरिता सेवाकराअंतर्गत नोंदणी असलेल्या व्यापाऱ्यांनाही व्यवसाय कराअंतर्गत नोंदणी आवश्यक असल्याचे प्रावधान प्रस्तावित आहे.

Åव्यवसाय कराअंतर्गत करदात्यास विवरणपत्र दाखल करण्यास विलंब झाला तर त्यास रुपये एक हजार विलंब शुल्काची आकारणी होते. विवरणपत्राच्या अभावी करदात्याची निर्धारणा करणे शक्य होत नाही. विवरणपत्र दाखल करण्यास प्रोत्साहन मिळण्याकरिता जे करदाते दिनांक ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत प्रलंबित विवरणपत्रे दाखल करतील त्यांना विलंब शुल्क माफ करण्याचे प्रस्तावित आहे.

➢ **<u>प्रवेश कर अधिनियम</u> :-**

राज्याचा वाजवी महसूल संरक्षित होण्याकरिता काही वस्तूंवर प्रवेश कराची आकारणी केली जाते. प्रवेश कराअंतर्गत आयातदाराची निर्धारणा करण्याकरिता पुरेसा कालावधी मिळण्यासाठी, निर्धारणाबाबतची समय मर्यादा पूर्वलक्षी प्रभावाने मूल्यवर्धित कर अधिनियमातील प्रावधानाप्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

८. अध्यक्ष महोदय, मी आता माझे करविषयक प्रस्ताव सभागृहासमोर सादर करीत आहे.

➢ **<u>ऊस खरेदी कर</u> :-**

सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे मिलवाईज निर्यात कोटा पूर्ण करणाऱ्या साखर कारखान्यांना सन २०१५-१६ चा ऊस खरेदी कर माफ करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. केंद्र शासनाने साखर कारखान्यांबाबतचे निर्यात कोटा धोरण मागे घेतले असल्याने संबंधित अट संयुक्तिक ठरत नाही. त्यामुळे सन २०१५-१६ वर्षासाठी निर्यातीची अट असणार

नाही. शेतकऱ्यांना रास्त व किफायतशीर भाव देता यावेत याकरिता सन २०१५-१६ तसेच २०१६-१७ वर्षाकरिता साखर कारखान्यांचा ऊस खरेदी कर माफ करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. दोन्ही वर्षांचा एकत्रित विचार करता ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त व किफायतशीर भाव देण्याकरिता कारखान्यांकडे रुपये सातशे कोटी उपलब्ध होतील.

➢ **मूल्यवर्धित कर :-**

Å जीवनावश्यक वस्तूंसाठी करमाफी/सवलत :- राज्यात काही जीवनावश्यक वस्तू जसे तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर, सोलापुरी चादर व टॉवेल्स यांवर दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत सूट देण्यात आली आहे. सदर सूट जीएसटीपूर्व दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे प्रस्तावित करीत आहे. या वस्तूंसमवेत आमसुलासही करापासून सूट प्रस्तावित करीत आहे. त्याचप्रमाणे बेदाणे व मनुकांवरील करसवलत जीएसटीपूर्व दिनांकापर्यंत सुरू ठेवण्याचे प्रस्तावित आहे. चहावरील सवलतीचा सहा टक्के कराचा दरही जीएसटीपूर्व दिनांकापर्यंत सुरू राहील.

Å शेततळ्यांकरिताचे जीओ मेमब्रेनवर करमाफी :- केंद्र शासनाने सन २०२२ पर्यंत प्रत्येक शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाकरिता सर्वोच्च महत्त्व पाण्याच्या नियोजनाला असेल. ‘मागेल त्याला शेततळे’ हे आमच्या शासनाचे शेतकऱ्यांप्रती वचन आहे. त्याचअनुषंगाने शेततळ्यांकरिता आवश्यक असलेल्या जीओ मेमब्रेनवरील सहा टक्के कर मी शून्य करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

Å सॉईल टेस्टिंग किटवरील करमाफी :- शासनाचा शेतकऱ्यांप्रती नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन राहिला आहे. शेतीमधून उत्पन्न वाढविण्याकरिता जमिनीची सुपिकता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता सॉईल हेल्थ कार्डची संकल्पना अंमलात आली आहे. याच अनुषंगाने मृद तपासणी किट (Soil Testing Kit) वरील १३.५ टक्के कर मी शून्य करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

Å मिल्क टेस्टिंग किटवरील करमाफी :- दुधामध्ये भेसळीची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत. भेसळयुक्त दुधाचे प्राशन आरोग्यास अपायकारक आहे तर लहान मुलास घातक ठरु शकते. दुधाची शुद्धता तपासण्याकरिता दूध तपासणी किट (Milk Testing Kit) च्या वापरास उत्तेजन मिळावे याकरिता त्यावरील १३.५ टक्के कर मी शून्य करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

Å विमान इंधनावर करसवलत :- रिजनल कनेक्टीव्हीटी स्किम अंतर्गत विमान वाहतुकीस पर्यायाने पर्यटनास चालना देण्याकरिता राज्यातील दहा छोट्या शहरातील विमानतळांचा म्हणजेच अमरावती, गोंदिया, नाशिक, जळगांव, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, शिर्डी, सिंधुदुर्ग यांचा समावेश करण्यात आला आहे. या स्किम अंतर्गत समाविष्ट असलेल्या विमान उड्डानांकरिता लागणाऱ्या इंधनावरील कराचा दर पाच टक्क्यांवरुन यापुढील दहा वर्षांकरिता एक टक्का करण्याचे प्रस्तावित आहे.

Å कार्ड स्वाईप मशीनवरील करमाफी :- " डिजीटल इंडिया " या संकल्पनेसाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता आवश्यक असलेल्या कार्ड स्वाईप मशीनवरील १३.५ टक्के कर मी शून्य करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

Å गॅस व विद्युत दाहिनीवरील करमाफी :- वृक्षाच्या आवश्यकतेविषयी भाष्य करण्याची आवश्यकता नाही. त्याचे महत्त्व आपण सर्व जाणतोच. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याकरिता लाकडाचा वापर कमीतकमी होणे आवश्यक आहे. याचाच विचार करुन गॅस व विद्युत दाहिनीवरील १३.५ टक्के कर शून्य करण्याचे प्रस्तावित आहे.

Å मद्यावरील कर :- देशी, विदेशी व भारतीय बनावटीचे विदेशी मद्याच्या उत्पादक वा आयातदारास मद्याच्या कमाल विक्री किमतीवर २३.०८ टक्के अधिसूचित दराने कराचा भरणा करता येतो. सदर अधिसूचित कराच्या दरामध्ये मी वाढ प्रस्तावित करीत आहे. मद्याच्या कमाल विक्री किमतीवर २५.९३ टक्के अधिसूचित दराने कराची आकारणी प्रस्तावित आहे.

➢ **लॉटरी कर** :- राज्यातील ऑनलाईन व पेपर लॉटरीवर सोडतनिहाय कर आकारण्यात येतो. साप्ताहिक योजनेस लागू असलेल्या सध्याचा सत्तर हजार रुपये कर, एक लक्ष रुपये करण्याचे प्रस्तावित आहे.

**करदेयते बाबतची संदिग्धता**

९. मूल्यवर्धित करआकारणीबाबतची संदिग्धता उद्योगावर विपरित परिणाम करु शकते. उद्योगाने काही निश्चित कारणामुळे कराचा भरणा केला नसेल व ते कारण सकृतदर्शनी संयुक्तिक असेल तर करदायित्वाची संदिग्धता दूर करणे आवश्यक ठरते.

प्रक्रिया केलेल्या मधुमक्यावर दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंतच्या करदराबाबत तसेच वस्त्रोद्योग संबंधातील उद्योगाच्या करदेयतेबाबत संबंधित उद्योगामध्ये संदिग्धता आहे. ही संदिग्धता दूर करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता प्रक्रिया केलेला मधुमका व वस्त्रोद्योग संबंधातील उद्योगाच्या कर आकारणीबाबत मी प्रस्ताव मांडत आहे :-

➢ मधुमका प्रक्रिया उद्योग :-

मधुमका हे शेती प्रक्रियेशी निगडित उत्पादन असून, या उद्योगास प्रोत्साहन द्यावयाची आवश्यकता आहे. प्रक्रिया केलेल्या मधुमकासंबंधात दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत कराच्या दराबाबत संदिग्धता असून, त्यावर कराची आकारणी या उद्योगास हानीकारक होऊ शकते. यामुळे मी दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीकरिता प्रक्रिया केलेला मधुमका करमुक्त करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

➢ **कापड प्रक्रिया उद्योग** :-

कापड प्रक्रिया उद्योगामध्ये प्रक्रियेच्या दरम्यान हस्तांतरित होणाऱ्या वस्तूंच्या मूल्यावर कराचे दायित्व येते. कापडावर विक्रीकराची आकारणी होत नसल्याने कापड प्रक्रिया उद्योगास दिनांक ३१ मार्च २००५ पर्यंत प्रशासकीय सवलतीद्वारे करमाफी देण्यात आली होती. केंद्र शासनाने दिनांक ८ एप्रिल २०११ रोजी अतिरिक्त

उत्पादन शुल्क अधिनियमामध्ये बदल केल्यामुळे कापड प्रक्रिया उद्योगावर करदायित्व लागू झाले. सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पामध्ये कापड प्रक्रिया उद्योगास मूल्यवर्धित करातून सूट देण्यात आली. मात्र, सुटीबाबतचे अधिनियमातील प्रावधान दिनांक १ मे २०१२ पासून अंमलात आले. यामुळे कापड प्रक्रिया उद्योगावर दिनांक ८ एप्रिल २०११ ते ३० एप्रिल २०१२ या कालावधीकरिता मूल्यवर्धित कराचे दायित्व निर्माण झाले आहे. हा कालावधी वगळता संपूर्ण कालावधीकरिता कापड प्रक्रिया उद्योगास करमाफी देण्यात आली आहे. सदर उद्योगाने संबंधित कालावधीस तांत्रिकदृष्ट्या करमाफी मिळालेली नाही या विचाराने ग्राहकांकडून कर गोळा केला नसल्याचे निदर्शनास आले असल्याने करदायित्व असलेल्या कालावधीस करमाफी देणे संयुक्तिक ठरते. ज्या कापड प्रक्रिया उद्योजकांनी दिनांक ८ एप्रिल २०११ ते ३० एप्रिल २०१२ कालावधीकरिता ग्राहकांकडून कर वसूल केलेला नाही किंवा करभरणा केलेला नाही त्यांना करमाफी प्रस्तावित करण्यात येत आहे.

➢ **यार्न वार्पिंग व सायझिंग प्रक्रिया उद्योग** :-

वस्त्रोद्योगातील प्राथमिक प्रक्रिया यार्न वार्पिंग व सायझिंग आहे. व्यापक रोजगार व अल्प मूल्यवर्धन असलेल्या या उद्योगास १ एप्रिल २०१६ पासून मूल्यवर्धित कर माफ करण्यात आला आहे. या उद्योगामध्ये साधारणत: स्टार्च, डिंक तसेच मटण टॅलोचा वापर करुन सुतास बळकटी देण्यात येते व नियोक्त्याने दिलेल्या यार्नवर प्रक्रिया करताना या वस्तूंच्या होणाऱ्या हस्तांतरणावर मूल्यवर्धित कराची देयता येते. कापड व कापड प्रक्रिया उद्योगावर मूल्यवर्धित कराची आकारणी होत नसल्याने कॉम्पोझिट मिलमध्ये वार्पिंग व सायझिंग प्रक्रिया झाल्यास त्यावर कराची आकारणी होत नाही. फक्त वार्पिंग व सायझिंग प्रक्रिया करणाऱ्या लघुउद्योगावर मात्र कराची आकारणी होते. उद्योगामध्ये अल्प मूल्यवर्धन असल्याने करदायित्वही अल्प असते. उद्योगावर करदायित्वाची परिगणना करून कराची मागणी केल्यास या लघुउद्योगावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, यार्न वार्पिंग व

सायझिंग उद्योगास दिनांक १ एप्रिल २००५ पासून दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत ज्या उद्योजकांनी ग्राहकांकडून कर वसूल केलेला नाही किंवा करभरणा केलेला नाही त्यांना करमाफी प्रस्तावित करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या कर प्रस्तावांद्वारे सुमारे रुपये ३९६ कोटी इतका अतिरिक्त महसूल प्राप्त होईल असा अंदाज आहे. सदर वाढ ही सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अंतर्भूत केली आहे. या प्रस्तावांना सन्माननीय सभासदांचा पाठिंबा मिळेल असा माझा विश्वास आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!